# मेट्रो-३ प्रकल्पाचा विशेष गौरव

## 'टनेलिंग प्रोजेक्ट ऑफ दि इअर' पुरस्काराने सन्मान

मुंबई, ता. २३ : मुंबई मेट्रो रेल कॉर्पोरेशनला 'मेट्रो-३ प्रकल्प यशस्वीरित्या राबविल्याबद्दल 'टनेलिंग प्रोजेक्ट ऑफ दि इअर' आणि 'सेफ्टी इनिशिएटिव्ह ऑफ दि इअर' पुरस्काराने सन्मानित करण्यात आले आहे. मुंबईत आयोजित केलेल्या 'टनेलिंग अँड अंडरग्राऊंड स्पेस'मध्ये हवामानातील लवचिकता आणि टिकाऊपणा या विषयावर सुरू असलेल्या 'टनेलिंग एशिया २०२३' आंतरराष्ट्रीय परिषदेत हे पुरस्कार प्रदान करण्यात आले.

'टनेलिंग अँड अंडरग्राऊंड स्पेस अवॉर्ड्स २०२३' मध्ये प्रतिष्ठित अशा 'टनेलिंग असोसिएशन ऑफ इंडिया'तर्फे (टीएआय) हा पुरस्कार सोहळा आयोजित करण्यात आला होता. 'टीएआय' ही आंतरराष्ट्रीय टनेलिंग अँड अंडरग्राऊंड स्पेस असोसिएशनची (आयटीए) भारतीय शाखा असून त्यांची स्थापना १९९१ मध्ये केंद्र सरकारच्या केंद्रीय सिंचन आणि ऊर्जा मंडळाच्या अधिपत्याखाली करण्यात आली. केंद्रीय गृहनिर्माण आणि शहरी व्यवहारमंत्री तसेच पेट्रोलियम आणि नैसर्गिक वायूमंत्री हरदीप सिंग पुरी यांच्या हस्ते आज परिषदेचे उद्घाटन झाले. 'आयटीए' टनेलिंग अवॉर्ड्स २०२३ चे यंदाचे नववे वर्ष असून, २०१५ पासून आयटीए टनेलिंग आणि अंडरग्राऊंड स्पेस ॲवॉर्ड्स हे बोगदे आणि भूमिगत बांधकामातील नवकल्पना आणि उत्कृष्ट प्रकल्पांना सन्मानित करतात.



'टनेलिंग प्रोजेक्ट ऑफ दि इअर' श्रेणीमध्ये पुरस्कार मिळणे ही एक सन्मानाची गोष्ट आहे. अत्यंत कठिण आणि गर्दीच्या भागातून जाणाऱ्या संरेखनामुळे 'मेट्रो-३' प्रकल्प एक अभियांत्रिकी अविष्कार ठरला आहे. गजबजलेल्या भागातून मार्ग काढणे, वाहतूक व्यवस्थापन करणे, स्थानिकांचे पुनर्वसन करणे, समुद्रकिनाऱ्याजवळ बोगदे बांधणे तसेच पाण्याखालून भुयारी मार्ग काढणे, यांसारख्या अनेक आव्हानांना या प्रकल्पाला सामोरे जावे लागले; मात्र आधुनिक तंत्रज्ञान आणि अभियांत्रिकी कौशल्याच्या सहाय्याने ही आव्हाने यशस्वीरित्या पार करण्यात आली. महाराष्ट्र सरकार व विविध सरकारी विभागांच्या सहकार्यामुळे हा प्रकल्प सध्याच्या टप्प्यात येण्यास सोयीस्कर झाले आहे, अशी प्रतिक्रिया मुंबई मेट्रो रेल कॉर्पोरेशनच्या व्यवस्थापकीय संचालक अश्विनी भिडे यांनी व्यक्त केली.

> इमारत व त्यातील रहिवासी, तसेच बांधकाम कामगारांची सुरक्षा आणि संरचनात्मक अखंडता सुनिश्चित करताना मेट्रो-३ प्रकल्प राबवणे हे आमच्यासाठी नेहमीच प्रथम प्राधान्य राहिले आहे. गेल्या सात वर्षांतील २५० दशलक्ष तासामागे कामगारांना कामाच्या ठिकाणी दुखापत होण्याचा सरासरी दर ०.३४ इतका आहे, जो आंतरराष्ट्रीय पातळीवरील प्रकल्पांमधील दुखापतीच्या घटनांच्या सरासरी दर ०.५ च्या मानाचे खूपच कमी आहे.
>
> **- सुबोध गुप्ता,** संचालक (प्रकल्प), मुंबई मेट्रो रेल कॉर्पोरेशन